“जानेवारी, २०१९ पासून "दक्षता" मासिकाची किंमत रु.३०/- एवढी वाढविल्याने पोलीस महासंचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार यांना माहे जानेवारी, २०१९ पासून "दक्षता" मासिक रु. २५/- या सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

तसेच महाराष्ट्र पोलीस दलामधील बरेच पोलीस अधिकारी / अंमलदार त्यांचे नेमणूकीत कायदा व सुव्यवस्था राखण्याचे त्यांचे कर्तव्य सांभाळून स्वेच्छेने समाज विधायक कार्यास स्वत:ला वाहून घेतात.  त्यांचे देश व समाजाप्रती बांधिलकी मानून करीत असलेले समाजाभिमुख असणारे कार्य निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे.  पोलीस सेवेच्या अत्यंत धकाधकीच्या आयुष्यातही स्वेच्छेने व आत्मिक आनंद देणाऱ्या त्यांच्या सामाजिक कार्यात व्यस्त असतात हे खचितच कौतुकास्पद आहे. अशा आगळेवेगळे काम करणाऱ्या या सुहृद पोलीसांचे कार्य समाजासमोर आणल्यास निश्चितच महाराष्ट्र पोलीस दलाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोनही बदलून जाईल यात शंका नाही.

त्यामुळे समाजासाठी स्वेच्छेने काम करणाऱ्या वरिष्ठ व कनिष्ठ पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या कार्यांची सविस्तर माहिती "दक्षता" मासिकामध्ये प्रकाशित करण्यात येते. तरी अशी सविस्तर माहिती दक्षतामध्ये प्रकाशित करण्यासाठी फोटोसहीत "दक्षता" मासिकाच्या mpd.dakshata@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पाठवावी.”